**विषयः-सन २०१६-१७ साठी ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्याच्या नवीन नोंदणीस/नोंदणी नुतनीकरणास मान्यता प्रदान करणेबाबत.**

**कृषि आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,शिवाजीनगर पुणे-४११ ००५.**

क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३७/ ८६४ /फलो-४
दिनांक :०३ सप्टेंबर, २०१६.

**वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक प्रकृसिं-२११६/प्र.क्र.१४०/४-अे, दि.१२ ऑगस्ट,२०१६**
**२) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृआआ-२०१६/सुसिंयो/कंपनीनोंदणी/आदेश/ठिबक/प्र.क्र.३८/ ८५६,दि.०३ सप्टेंबर,२०१६**

**आदेश**

उपरोक्त संदर्भ क्र.२ वरील आदेशाव्दारे २० **ठिबक *सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या*** नवीन नोंदणीस मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त संदर्भ १ येथिल दिनांक १२ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सोबत जोडलेल्या ***परिशिष्ट- १*** मध्ये नमूद केलेल्या **९ *ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांच्या*** नवीन नोंदणीस सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या जिल्यामध्ये सुक्ष्म सिंचनाची कामे करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. सूक्ष्म सिंचन योजना अंमलबजावणीसाठी या आदेशान्वये ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांची करण्यात आलेली नोंदणी ***सन २०१६-१७ ते २०१८-१९*** या तीन वर्षासाठी वैध राहिल. मात्र सदरहू कंपन्यांनी पुढील प्रत्येक वर्षी कृषि आयुक्तालयाने विहित केलेले नोंदणी शुल्क रु.२५,०००/- भरुन नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे.

२. कृषि आयुक्तालयस्तरावर **दि.१९/११/२०१४** रोजी सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी प्रतिनिधी सोबत झालेल्या बैठकीत कृषि आयुक्तालय व सूक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपनी यांच्यामध्ये करावयाचा अंतिम केलेल्या करारनाम्याच्या नमुन्यामध्ये रुपये १००/- च्या स्टॅम्पपेपरवर नोटराईज्ड करारनामा करून तो एक महिन्याच्या आत सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीने आयुक्तालयास सादर करावा.

३. सोबतच्या यादीत नमूद केलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादक कंपन्यांची सन २०१६-१७ साठी नोंदणी केलेली आहे, त्या सर्व कंपन्यांनी प्रत्येकी रु.२,००,०००/- रक्कमेची बँक गँरंटी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर एक महिन्याच्या आत कृषि आयुक्तालयास सादर करावयाची आहे.

***४. या आदेशान्वये नोंदणी केलेल्या कंपन्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रत्येक घटकांच्या बीआयएस वैध मुदतीपर्यंतच त्या कंपनीची नोंदणी राहिल. बीआयएस नुतनीकरणाची कागदपत्रे विहित मुदतीत कृषि आयुक्तालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधीत कंपनीची राहील.अशी कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास त्या कंपनीची नोंदणी घटकनिहाय बीआयएस मुदतीच्या अंतिम तारखेनंतर आपोआप रद्द होईल.***

५. वरील प्रमाणे विहित घटकांच्या बीएसआय नोंदणीबाबतची/नुतनीकरणाची प्रमाणपत्रे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सुध्दा वर नमूद केल्याप्रमाणे वेळेत सादर करणे संबंधीत कंपन्यांना बंधनकारक राहील.

६. नोंदणीच्या वेळी नोंदणीकृत कंपन्यानी सादर केलेल्या दरपत्रकातील दरापेक्षा जास्त दराने, कोणत्याही घटकांची विक्री करता येणार नाही. तसेच सदरचे दरपत्रक कृषि आयुक्तालयाच्या इ-ठिंबक आज्ञावलीवर नोंदणीवेळी

नोंदणीकृत कंपन्यानी भरणे आवश्यक आहे. नोंदणीकृत कंपन्यांनी त्यांच्या दरपत्रकात त्या आर्थिक वर्षात वाढ किंवा घट केल्यास इ-ठिंबक आज्ञावलीवर भरणे व कृषि आयुक्तालयास त्वरित कळविणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

७. मार्गदर्शक सुचनामध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक जिल्हयात विक्रिपश्चात सेवा केंद्र उभारणी करणे व त्याबाबतची आवश्यक ती माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर करुन त्यांची तपसाणी करुन घेण्याची जबाबदारी संबधीत नोंदणीकृत कंपन्यांची राहील. नोंदणीस मान्यता प्राप्त होताच विक्रीपश्चात सेवा केंद्राची एक महिन्यात तपासणी करुन घेऊन त्याचा अहावाल कृषि आयुक्तालयास सादर करण्याच्या अटीच्या अधिन राहून सन २०१६-१७ साठी नोंदणी करण्यात येत आहे

८. नोंदणीकृत कंपन्यानी मान्यता दिलेल्या प्रत्येक जिल्हयातील त्यांच्या वितरकांची यादी नोंदणीसाठी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयाकडे सादर करुन त्यांची नोंदणी करुन घेणे आवश्यक आहे.

९. सन २०१६-१७ च्या मार्गदर्शक सूचनामधील **परिच्छेद-७** नुसार व त्यातील **परिशिष्ट-१८** मधील विहीत नमुन्यात वितरकाने साठा नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदरची नोंदवही सुक्ष्म सिंचन उत्पादक कंपनीच्या अधिकृत प्रतिनिधीनी व संबधीत तालुका कृषि अधिकारी यांनी संयुक्तरित्या प्रमाणित करणे बंधनकारक आहे. तसेच या मार्गदर्शक सूचनामधील **परिच्छेद-७(६)** नुसार नोंदणीकृत कंपनीने उत्पादीत केलेल्या व वितरकांना पुरवठा केलेल्या सर्व घटकांचा घटकनिहाय अहवाल दरमहा महिना संपताच पुढील माहिन्याच्या १० तारखेपर्यत कृषि आयुक्तालयास सादर करणे आवश्यक आहे.

१०. नोंदणीकृत कंपन्यांनी नियुक्त केलेल्या अधिकृत वितरक / विक्रेते, अधिकृत प्रतिनिधी यांनी अनियमितता अथवा शेतकरी, शासन इत्यादिची फसवणूक केल्यास त्या बाबीस वितरक / विक्रेत्या बरोबरच कंपनी प्रतिनिधी व कंपनीसुध्दा जबाबदार राहील.

११. सन २०१६-१७ या वर्षामध्ये केंद्र/राज्य शासन, कृषि आयुक्तालयस्तरावरुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या सुचना, अटि व शर्ती इत्यादींचे पालन व त्यानुसार अंमलबजावणी करण्याची जाबाबदारी नोंदणीकृत कंपन्यावर राहील

१२. सन २०१६-१७ साठी मार्गदर्शक सुचना कृषि आयुक्ताल्याचे पत्र क्र.कृआआ-२०१६/सुसिंयो/प्र.मं.कृ.सिं.यो./प्र.मा./प्र.क्र.२५/७९४,दि.३०.०८.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. यापुढे केंद्र, राज्य शासन, कृषि आयुक्तालयस्तरावरुन वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या सुचना, अटि व शर्ती सुक्ष्म सिंचन संच उत्पादक कंपन्या व त्यांच्या अधिकृत वितरकांवर बंधनकारक रहातील.

**सोबतः नोदणी/नुतनीकरणास मान्यता देण्यात आलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादकांची यादी.**

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रति,**

मे. ---------------------------------
---------------------------------
---------------------------------
---------------------------------
---------------------------------

**प्रतिलिपी - यांना माहितीसाठी व पुढील प्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषीत.**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, सर्व**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

१. सन २०१६-१७ या वर्षासाठी सुध्दा जिल्हास्तरावर संबधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांच्या जिल्हातील वितरकांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी वितरक नोंदणीसाठी आवश्यक असलेले व कृषि आयुक्तालयाने विहित केलेले ***शुल्क रु.२७५०/- (अक्षरी रु.दोन***

*हजार सातशे पन्नास फक्त) ग्रासप्रणालीव्दारे / चलनाव्दारे खालील लेखाशिर्षांतर्गत भरुन घ्यावे.* तसेच रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) रकमेची बँक गॅरंटी घेवून वितरकांची नोंदणी करावी.(ठिबक व तुषार या करीता शुल्क स्वतंत्र भरण्याची आवश्यकता नाही)

**मागणी क्र.डी.-१**
**०४०१ - पीक संवर्धन**
**८००, इतर जमा रकमा**
**(०१)(१२) इतर बाबी**
**(०४०१०४५५)**

२. संबधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व त्यांचे जिल्हातील सुक्ष्म सिंचन वितरक या दोघामधील कृषि आयुक्तालयाने विहित करुन दिलेल्या नमुन्यातील करारनामा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर नोटराइज्ड करुन घ्यावा. सदर करारनाम्यामध्ये " कृषि विभागाने सुक्ष्म सिंचन कार्यक्रम राबविण्यासाठी त्यांना आवश्यक असणारे सहकार्य वेळोवेळी मागीतलेली माहिती तसेच बीलांच्या स्वाक्षरीत छायांकीत प्रती वितरकाने विहीत मुदतीत दिल्या नाहीत तर त्यांची सन २०१६-१७ साठीची नोंदणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून रद्द करण्यात येईल तसेच पुढील आर्थिक वर्षात त्यांची नोंदणी / नुतनीकरण करण्यात येणार नाही " या अटीचा नव्याने अंतर्भाव करावा.

३. नोंदणीकृत कंपनीच्या जिल्हयातील विक्रिपश्चात सेवा केंद्राची तपासणी सन २०१६-१७ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील ***परिशिष्ट १३*** प्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्वतः किंवा त्यांचे अधिनस्त असलेल्या गट-अ अथवा गट-ब मधील अधिकाऱ्यांमार्फत कंपनीची कृषि आयुक्तालयस्तरावरुन नोंदणी झाल्यापासून एक महिन्याच्या आत तपासणी करुन त्यास मान्यता द्यावी.

४. वितरकाने विहित नमुन्यात साठा नोंदवही ठेवणेबाबत विहित प्रपत्र व त्याबाबतचे अदेश जिल्हास्तरावरुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी निर्गमित करावेत.

५. सन २०१६-१७ मध्ये सुक्ष्म सिंचन योजनेच्या अंमलबजावणीत कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता कंपन्या त्यांचे वितरक/विक्रेते तसेच कृषि विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांनी घेणे आवश्यक आहे.

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

परिशिष्ट-१

सन २०१६-१७ साठी नोंदणी केलेल्या ठिबक सिंचन संच उत्पादकांची यादी

| अ. क्र. | कंपनीचे नाव | lateral BIS- 12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | मान्यताप्राप्त जिल्हे | नोंदणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २१ | मे.फॉरच्यून इंडस्ट्रिज, प्लॉट नं.अे-६७,कुरकुंभ एम.आय.डी.सी., दौंड, पुणे fortunedrip@gmail.com | 3955985 dt.31.07.2016 | 7800012014 Dt.25.02.2017 M/S Prakash Technoplast, Nasik | 3962982 dt. 31.07.2016 | 7272068 - dt.31.07.2016<br>3006128 - dt.30.06.2016<br>M/s. Joshi Agro Industries, Jadhavwadi, Pune.<br>M/s.Automat Irrigation Pvt.Ltd., Haridwar, Uttarkand | अहमदनगर, पुणे, सोलापूर, सांगली, सातारा, औरंगाबाद, उस्मानाबाद(एकुण ७ जिल्हे) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| २२ | मे.नीलोप्लास्ट, २४३, जी.आय.डी.सी., मकरपुरा इंडस्ट्रीयल इस्टेट,वडोदरा, गुजरात - ३९००१० | 2304535 dt.15/11/2016 | 7147065 dt. 31/08/2016 | 3659779 dt. 26/08/2016 M/s Dhara Irrigation Bhavnagar (Gujrat) | 7045865 - dt.15/06/2017 M/s Vyas Agro Indushries, Vadodara, (Gujrat) | नाशिक, बीड, लातुर, औरंगाबाद, जालना, परभणी,हिंगोली, नांदेड, पुणे, सोलापूर (एकूण जिल्हे - १०) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| २३ | मे.जैन ईरिगेशन सि.लि., जैन प्लास्टीक पार्क,पो.बॉ.नं.७२, एन.एच.नं.६, जळगाव - ४२५००१ | 2199766 dt.28/02/2017 | 7050555 dt.15/07/2017 | 7223560 dt.31/08/2016 | 7025657 - dt. 15/09/2016 M/s. Jain Irrigation Systems | अहमदनगर,अकोला,अमरावती, औरंगाबाद,बीड, भांडारा, बुलढाणा, चंद्रपुर,धुळे,गोंदिया,हिंगोली, जळगाव,जालना,कोल्हापुर, लातुर, रायगड,नागपुर,नांदेड,नंदुरबार, नाशिक, उस्मानाबाद,परभणी, पुणे, सांगली,सातारा,सोलापुर,ठाणे,वर्धा, वाशिम,यवतमाळ,रत्नागिरी,सिंधुदुर्ग, गडचिरोली,पालघर (एकूण जिल्हे-३४) | २०१६-१७ ते २०१८-१९ |

संचालक,फलोत्पादन

कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

| अ. क्र. | कंपनीचे नाव | lateral BIS- 12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | मान्यताप्राप्त जिल्हे | नोंदणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २४ | सोना पॉलीप्लास्ट प्रा. लि.,माणिक भवण,पोस्ट बॉक्स नं.४, कोपरगाव, अहमदनगर - ४२३६०१ | 3683372 dt.30.11.2017 | 3685982 dt.30.11.2017 | 3682572 dt.30.11.2017 | 7272068 - dt. 31.07.2015<br>7714781 - dt.01.03.2016<br>3006128 - dt. 13/06/2017<br><br>M/s joshi Agro Industri, pune<br>M/s. kimplus pipping system,Nasik<br>M/s Automat Irrigation pvt.ltd, Uttaranchal | अकोला,नागपुर,यवतमाळ, बुलढाणा,धुळे,औरंगाबाद, लातुर, सोलापुर,उस्मानाबाद, कोल्हापुर, गोदींया,चंद्रपुर,वर्धा,जळगाव, जालना,नाशिक,नंदुरबार,बीड, परभणी,नांदेड,अहमदनगर,पुणे, सांगली,सातारा,अमरावती, वाशिम, हिंगोली,भंडारा,गडचिरोली (एकूण जिल्हे २९) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| २५ | मे.गांधलीकर ॲग्रीटेक प्रा.लि.,३०१,नवतेज कॉम्प्लेक्स, जुना आग्रा रोड, दत्त मंदीर, देवपूर, धुळे ४२४००५ | 7800001514 Dt.09.03.2017 | 7596502 Dt.31.03.2017 M/S.D.J.Irrigation, Nasik | -- | 7714781 - dt.01.03.2016<br>3006128 - dt. 13/06/2017<br>M/s. kimplus pipping system,Nasik<br>M/s Automat Irrigation pvt.ltd, Uttaranchal | धुळे, नंदुरबार, नांदेड, अहमदनगर,जालना, औरंगाबाद, बुलडाणा, जळगाव (एकूण जिल्हे ८) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| २६ | मे.स्पार्क ईरिगेशन, गट नं.३३२,पी.बी.७१, तारसोड,जळगाव sparkirrigation@yahoo.com | -- | -- | 7800004714 Dt.21.05.2017 | 3954983 - Dt.11.06.2016<br>3006128 - Dt.13.06.2016<br>M/S Shri Sairam Plastics & Irrigation Pvt Ltd, Jalgaon<br>M/S Automat Irrigation Pvt.Ltd., Uttarkhand | अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलडाणा, धुळे, हिंगोली, जळगांव, जालना, लातूर, नागपूर, नांदेड, नंदूरबार, नाशिक, उस्मानाबाद, परभणी, पुणे, सांगली, सातारा, वर्धा, वाशिम, यवतमाळ (एकूण जिल्हे - २३) | २०१६-१७ ते २०१८-१९ |

**संचालक,फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे

| अ. क्र. | कंपनीचे नाव | lateral BIS- 12786 CML no. & validity | Emiiter (online) BIS- 13487 CML no. & validity | Inline BIS- 13488 CML no. & validity | Filter BIS- 12785 CML no. & validity with brand name | मान्यताप्राप्त जिल्हे | नोंदणी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २७ | मे. ग्रीन गोल्ड इरिगेशन प्रा.लि.,राधाकृष्ण इंडस्ट्रीयल इस्टेट, खैरघर रोड, डोंगरगृह राजनंदगाव,छत्तीसगड. | 5757890 dt.30.04.2017 | 5758791 dt.30.04.2017 | 5757991 dt.30.04.2017 | 3006128 - dt. 30.06.2017 M/s.Automat Irrigation Pvt.Ltd., Haridwar, Uttarkand | नागपूर,वर्धा, चंद्रपूर, भंडारा,गोंदिया, यवतमाळ,अमरावती,नांदेड,सोलापूर अहमदनगर,पुणे,सातारा,लातूर,अकोला, धुळे,बीड,औरंगाबाद,जालना,सांगली, कोल्हापूर, बुलढाणा, उस्मानाबाद, गडचिरोली, वाशिम, परभणी, हिंगोली, नंदूरबार,जळगाव,नाशिक (एकुण २९ जिल्हे) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| २८ | मे.वेदांत इरिगेशन सिस्टीम प्रा.लि.,१११, तीसरा मजला, ७- मुख्य पीनय इंडस्ट्रीयल अेरीया, बेंगलोर - ५६००५८ vedantairrigation@gmaik.com | 3558975 Dt.24.10.2016 | 4443559 Dt.02.05.2017 | 3558874 Dt.24.10.2016 | 3341546 - Dt.04.04.2017<br>4739883 - Dt.15.05.2017<br>7714781 - Dt.01.03.2017<br>M/S. Sigma perporatrs , Benglore<br>M/S Dhanushri Indusries Banglore<br>M/S Kimplas Piping Sys., Nasik | औरंगाबाद, बुलडाणा, धुळे, जालना, नाशिक, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, नांदेड (एकूण जिल्हे - ९) | २०१६-१७ ते २०१८-१९ |
| २९ | मे.प्रगती पाईप इंडस्ट्रज प्रा.लि.,प्लॉट नं.६२४, सेक्टर-अे, उर्ला इंडस्ट्रीयल एरिया, रायपूर,छत्तीसगड-४९२ ००३ | 3103025 Dt.30.04.2017 | 3103126 Dt.30.04.2017 | 3206540 Dt.31.05.2017 | 3006128 - Dt.13.06.2016 M/S Automat Irrigation Pvt.Ltd., Uttarkhand | नागपूर, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, अकोला, बुलडाणा, वाशिम, बीड, लातूर (एकूण जिल्हे - ११) | २०१६-१७ ते २०१८-१९ |

टीप : घटकनिहाय बी.आय.एस. मुदतीपर्यंत व कृषि विभागाच्या प्रस्तावीत कारवाईच्या अधीन राहून नवीन नोंदणी करण्यात आली आहे. नवीन नोंदणीची मुदत वाढविण्यासाठी बी.आय.एस. च्या मुदतवाढीचे पत्र सादर करण्याची जबाबदारी कंपनीची राहील.

संचालक(फलोत्पादन)
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे